




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : १४७ • पुणे • बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


| जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक २०२६ | पक्ष | भाजप | शिंदे सेना | राष्ट्रवादी अ.प. | ठाकरे सेना | राष्ट्रवादी श.प. | काँग्रेस | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा परिषद एकूण सदस्य ७३१ | २२५ | १६२ | १६५ | ४३ | २६ | ५५ | ५५ |

# जिल्हा परिषदेत महायुतीचा डंका

**विधानसभा, महापालिका, नगरपालिकांच्या पाठोपाठ जिल्हा परिषदांमध्येही भाजपचाच वरचष्मा राहिला आहे. १२ जिल्हा परिषदांपैकी सहा जिल्ह्यांमध्ये भाजपला बहुमत अथवा सर्वाधिक जागा मिळाल्या.**




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा, महापालिका, नगरपालिकांच्या पाठोपाठ जिल्हा परिषदांमध्येही भाजपचाच वरचष्मा राहिला आहे. १२ जिल्हा परिषदांपैकी सहा जिल्ह्यांमध्ये भाजपला बहुमत अथवा सर्वाधिक जागा मिळाल्या. भाजपपाठोपाठ अजित पवारांच्या राष्ट्रवादीने दुसरा क्रमांक पटकवून शिवसेना शिंदे गटाला मागे टाकले. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये महायुतीने प्राबल्य कायम राखले आहे.

आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत असलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक निकालात भाजपने वर्चस्व कायम राखले आहे. भाजपला दोन जिल्हा परिषदांमध्ये बहुमत मिळाले असून, चार जिल्ह्यांत सर्वाधिक जागा मिळाल्या. राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाला प्रत्येकी दोन जिल्हा परिषदांमध्ये सर्वाधिक जागा मिळाल्या. काँग्रेस व शरद पवार गटाला प्रत्येकी एका जिल्हा परिषदेत सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. जिल्हा परिषदेत २२५ तर पंचायत समित्यांमध्ये ४५९ जागा जिंकून भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. भाजपला सिंधुदुर्ग आणि सोलापूर या दोन जिल्हा परिषदांमध्ये बहुमत मिळाले. सातारा, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव या चार जिल्हा परिषदांमध्ये भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या.

अजित पवार यांच्या निधनानंतर लगेचच झालेल्या या निवडणुकीत सहानुभूतीचा फायदा राष्ट्रवादीला झाला आहे. पुणे जिल्हा परिषदेत ७३ पैकी ५१ जागा जिंकून राष्ट्रवादीने एकतर्फी यश मिळविले. कोल्हापूरमध्ये पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या. विधानसभा, महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये शिंदे गट दुसऱ्या क्रमांकावर होता. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये मात्र अजित पवार गटाने दुसरा क्रमांक पटकविला आहे. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूने निर्माण झालेल्या सहानुभूतीचा राष्ट्रवादीला राज्यभर फायदा झालेला दिसतो. काही जिल्ह्यांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याचा उभयतांना फायदा झालेला दिसतो. जिल्हा परिषदेत भाजपला पश्चिम महाराष्ट्रातही चांगले यश मिळाले ही पक्षासाठी जमेची बाजू ठरली आहे. कारण आतापर्यंत भाजपला पश्चिम महाराष्ट्रात तेवढे यश मिळत नव्हते, पण पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात तसेच सहकाराचे प्राबल्य असलेल्या भागांमध्ये भाजपची पाळेमुळे घट्ट झाली आहेत. शिवसेना शिंदे गटाने रत्नागिरीत सत्ता जिंकून कोकणात शिवसेनेचीच ताकद असल्याचे दाखवून दिले. रत्नागिरी जिल्ह्यातील नारायण राणे यांच्या वर्चस्वाला शिंदे यांनी धक्का दिला आहे. रायगडमध्येही सर्वाधिक जागा शिंदे गटाने जिंकल्या. काँग्रेसला सर्वाधिक २३ जागा लातूर जिल्ह्यात मिळाल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यामुळे सांगली जिल्ह्यात पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या.

रायगडमध्ये शिवसेना शिंदे गटाला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजप ही निवडणूकपूर्व युती सत्तेत येईल, असा दावा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केला. लातूरमध्ये काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या असल्या तरी भाजप आणि अजित पवार गटाचे एकत्रित संख्याबळ अधिक होते.

त्यामुळे काँग्रेसला सत्ता मिळणे कठीण आहे. सांगलीतही शरद पवार गटाला सत्तेसाठी काँग्रेस तसेच अजित पवार गटाची साथ लागणार आहे. साताऱ्यात भाजप व राष्ट्रवादीला आघाडी केल्याशिवाय सत्ता मिळू शकणार नाही. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपला सत्तेसाठी शिवसेना व राष्ट्रवादीची मदत घ्यावी लागेल. परभणी, धाराशिवमध्येही भाजपला मित्र पक्षांच्या मदतीशिवाय सत्ता मिळणे कठीण आहे. या साऱ्या घडामोडींमध्ये काही ठिकाणी उलट सुलट समीकरणे आकारास येऊ शकतात. तसेच घोडेबाजारही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## रायगडमध्ये शेकापचा भोपळा

राज्याच्या राजकारणात एकेकाळी शेकापचा मोठा प्रभाव होता. कालांतराने शेकाप हा रायगड जिल्ह्यापुरताच मर्यादित राहिला. रायगड जिल्हा परिषदेत अनेक वर्षे सत्ता भोगलेल्या शेकापला यंदा भोपळाही फोडता आला नाही. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जातो.

## महाविकास आघाडीची पिछेहाट

महापालिका व नगरपालिकांपाठोपाठ जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीची कामगिरी निराशाजनकच झाली आहे. मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसला जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये १००चा आकडा गाठता आलेला नाही. शिवसेना ठाकरे गटाची पिछेहाट झाली आहे. शरद पवार गटाची काही ठिकाणी अजित पवार गटाबरोबर आघाडी होती. तेथे त्यांचा फायदा झाला.काँग्रेसमध्ये नेत्यांनाच यशराज्यात काँग्रेसचा धुव्वा उडाला असला तरी सतेज पाटील यांच्यामुळे कोल्हापूर, अमित देशमुख यांच्यामुळे लातूर तसेच विश्वजित कदम यांच्यामुळे सांगली जिल्ह्यांमध्ये काँग्रेसला यश मिळाले. सतेज पाटील यांच्या पुढाकाराने कोल्हापूर महानगरपालिकेतही काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. लातूर महानगरपालिकेत अमित देशमुखांमुळे काँग्रेसला सत्ता मिळाली.

## कोणत्या पक्षाला कोणत्या जिल्ह्यात यश?

भाजप : सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, सिंधुदुर्ग, धाराशिव
शिवसेना शिंदे : रत्नागिरी, रायगड
राष्ट्रवादी अजित पवार : पुणे, कोल्हापूर
काँग्रेस : लातूर
राष्ट्रवादी शरद पवार : सांगली

जिल्हा परिषद
एकूण जागा : ७३१
भाजप :२२५
राष्ट्रवादी अजित पवार :१६५
शिवसेना शिंदे : १६२
काँग्रेस : ५५
शिवसेना ठाकरे : ४३
राष्ट्रवादी शरद पवार : २६
मनसे : २
अपक्ष, इतर : ४१

पंचायत समित्या
एकूण जागा : १४६२
भाजप : ४५९
राष्ट्रवादी अजित पवार : ३०६
शिवसेना शिंदे : ३०२
काँग्रेस : ९७
शिवसेना ठाकरे : ८९
राष्ट्रवादी शरद पवार : ४६
अपक्ष, इतर : ८६

### पुणे (७३)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १० |
| शिंदेसेना | ०५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ५१ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०१ |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०६ |
| इतर | ०० |

### रत्नागिरी (५६)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | ०४ |
| शिंदेसेना | ४१ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०५ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०५ |
| इतर | ०१ |

### सांगली (६१)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १६ |
| शिंदेसेना | ०७ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०६ |
| राष्ट्रवादी (श.प.) | १८ |
| काँग्रेस | ११ |
| उद्धव सेना | ०१ |
| इतर | ०२ |

### छत्रपती संभाजीनगर (६३)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २३ |
| शिंदेसेना | २० |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०४ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०१ |
| काँग्रेस | ०१ |
| उद्धव सेना | ०९ |
| इतर | ०५ |

### कोल्हापूर (६८)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १२ |
| शिंदेसेना | ०९ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | २० |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | १४ |
| उद्धव सेना | ०१ |
| इतर | १२ |

### धाराशिव (५५)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १९ |
| शिंदेसेना | १५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०६ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०३ |
| उद्धव सेना | ०७ |
| इतर | ०५ |

### सातारा (६५)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १९ |
| शिंदेसेना | १५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १८ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०० |
| इतर | ०१ |

### सिंधुदुर्ग (५०)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २७ |
| शिंदेसेना | १३ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ०० |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०३ |
| इतर | ०७ |

### सोलापूर (६८)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | ३८ |
| शिंदेसेना | ०८ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | ११ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०५ |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०० |
| इतर | ०६ |

### परभणी (५४)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | २४ |
| शिंदेसेना | ०५ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १५ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०३ |
| उद्धव सेना | ०६ |
| इतर | ०१ |

### रायगड (५९)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १५ |
| शिंदेसेना | २३ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १७ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०० |
| काँग्रेस | ०० |
| उद्धव सेना | ०४ |
| इतर | ०० |

### लातूर (५९)

| पक्ष | जागा |
|---|---|
| भाजप | १५ |
| शिंदेसेना | ०१ |
| राष्ट्रवादी (अ.प.) | १२ |
| राष्ट्रवादी (श.प.) | ०१ |
| काँग्रेस | २३ |
| उद्धव सेना | ०१ |
| इतर | ०६ |

# अजित पवारांची ‘राष्ट्रवादी’च पुणे जिल्ह्यात ‘दादा’

**जिल्ह्यात केलेल्या कामाची आठवण ठेवून मतदारांनी अजित पवार यांच्या पक्षाला दिली साथ**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर दुःखाची छाया असलेल्या पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये अजित पवारांच्या ‘राष्ट्रवादी’ने सर्वाधिक जागा मिळवत पुणे जिल्ह्यात आपणच ‘दादा’ असल्याचे दाखवून दिले. आतापर्यंत अजित पवार यांच्या नेतृत्त्वामुळे तेच पुण्याचे ‘दादा’ असल्याचे अनेक निवडणुकांमध्ये दिसून आले. मात्र, आता अजित पवार नसले, तरी पुणे जिल्ह्यात केलेल्या कामाची आठवण ठेवून मतदारांनी अजित पवार यांच्या पक्षाला साथ देत आदरांजली वाहिली.



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही ‘राष्ट्रवादी’ बहुतांश ठिकाणी एकत्र होते. त्याचा या पक्षांना फायदा झाला. तसेच अजित पवार यांच्या निधनामुळे सहानुभूतीची लाट या पक्षांकडे होती. भाजप हा दुसऱ्या स्थानावर रहिला. शिवसेना (ठाकरे) गटाने शिवसेना (शिंदे) गटापेक्षा जास्त जागा मिळवित तिसरे स्थान पटकावले. काँग्रेसला मात्र एकाही जागेवर यश मिळाले नाही.

जिल्हा परिषदेच्या ७३ गट आणि पंचायत समितीचे १४६ गण आहेत. या निवडणुकीत ६८.३५ टक्के मतदान झाले. अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक झाल्याने या निवडणुकीत दुःखाचे वातावरण होते. कोणत्याही पक्षाने जाहीर सभा घेवून प्रचार केला नाही. मतदारांच्या वैयक्तिक गाठीभेटी घेवून प्रचार करण्यात आला. त्यामुळे मतदानाचे प्रमाण कमी झाले. त्यामध्ये अजित पवार यांच्या ‘राष्ट्रवादी’ने सर्वाधिक जागा घेत पुणे जिल्ह्यावर सत्ता कायम राखली.

बारामतीत शत प्रतिशत अजित पवार

अजित पवार यांच्या निधनामुळे मतदारांमध्ये निरुत्साह होता. बारामतीत सर्वांत कमी ५४.९० टक्के मतदान झाले. गेल्या वेळी ६१ टक्के मतदान झाले होते. सर्व पक्षांनी जाहीर प्रचार न करता मतदारांना वैयक्तिक भेटण्यावर भर दिला. बारामतीमध्ये जिल्हा परिषदेचे सहा गट आणि पंचायत समितीचे १२ गण आहेत.

अजित पवार यांच्या ‘राष्ट्रवादी’ने सर्व ठिकाणी उमेदवार उभे केले. भाजपने जिल्हा परिषदेत चार ठिकाणी आणि पंचायत समितीत ११ ठिकाणी उमेदवार उभे केले. दोन्ही ठिकाणी ‘राष्ट्रवादी’चे उमेदवार निवडून आल्याने भाजपवर नामुष्कीची वेळ आली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेसला एकही जागा मिळाली नसल्याने त्यांच्यावर नामष्की ओढवली.

या पक्षाचे पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप आणि भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यामुळे जिल्ह्यात काँग्रेस तग धरून होती. आता काँग्रेसला नेतृत्त्व राहिले नसल्याने एकाही ठिकाणी यश मिळाले नाही.

पुरंदरचे काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप आणि भोरचे काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. नगर परिषदेच्या निवडणुकीत सासवड वगळता अन्य ठिकाणी भाजपला शिरकाव करता आला नाही. तेव्हा प्रचाराला अजित पवार हे होते. या वेळच्या निवडणुकीत काँग्रेसच्या या माजी आमदारांमुळे भाजपने शिरकाव केला आहे.

# प्रभाग क्र. ३४ मधील पाणीप्रश्नांवर आढावा बैठक संपन्न

## ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा होऊन, नगरसेवकांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा निर्णय




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग (स्वारगेट) व प्रभाग क्रमांक ३४ मधील लोकनियुक्त नगरसेवक यांची आढावा बैठक सहाय्यक आयुक्त श्री. विजयकुमार वाघमोडे यांच्या अध्यक्षतेखाली सिंहगड रोड येथील क्षेत्रीय कार्यालयात संपन्न झाली. बैठकीत प्रभाग क्र. ३४ अंतर्गत नऱ्हेगाव, वडगाव बुद्रुक, वडगाव खुर्द व धायरी या परिसरांतील पाणीपुरवठ्याशी संबंधित विविध समस्या व उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

वडगाव बुद्रुक परिसरात २४x७ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत एल अँड टी कंपनीमार्फत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. समान व योग्य दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारींची दखल घेऊन नियोजनबद्ध पद्धतीने तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

वडगाव खुर्द परिसरातील राजयोग सोसायटी असेल, मधुकोष सोसायटी, गावठाण भाग व मानस परिसरात योग्य दाबाने पाणीपुरवठा व्हावा तसेच आवश्यक ठिकाणी नवीन पाणीपुरवठा लाईन टाकण्याबाबत चर्चा करून कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

धायरी हा नव्याने समाविष्ट झालेला परिसर असून सध्या तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून १२ इंची पाणीपुरवठा लाईन विकसित करणे, पंपिंग स्टेशन उभारणे व आवश्यक विद्युत लोड मंजूर करणे याबाबत चर्चा झाली. यासाठी सुमारे १ कोटी रुपयांच्या निधीची तातडीची मागणी मांडण्यात आली असून नगरसेवकांनी त्यास सकारात्मक पाठिंबा दर्शविला.

नऱ्हेगाव या विस्तारित परिसरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवरही सविस्तर चर्चा झाली. तक्षशिला, दरोडेनगर व महाराजानगर येथील पाण्याच्या टाक्यांशी संबंधित लाईन सक्षम करणे, अतिरिक्त मोटर्स व विद्युत पुरवठा उपलब्ध करून देणे तसेच पंपिंगचा कालावधी वाढविण्याबाबत नियोजन करण्यात आले.

या सर्व कामांसाठी एकूण सुमारे ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा होऊन तो नगरसेवकांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील टप्प्यात तातडीने कार्यवाही केली जाईल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीस प्रभाग क्र. ३४ चे नगरसेवक श्री. हरिदास चरवड, नगरसेवक श्री. राजाभाऊ लायगुडे, नगरसेविका सौ. जयश्री भूमकर, नगरसेविका सौ. कोमल नवले उपस्थित होते. तसेच अधिकारी वर्गामध्ये श्री. अभिजीत साठे (कार्यकारी अभियंता, विद्युत), श्री. जालिंदर सिंह राजपूत (उपअभियंता), श्री. अंकुश गावडे (कनिष्ठ अभियंता), श्री. सुहास महेंद्रकर (उपअभियंता, पाणीपुरवठा – वडगाव-धायरी-नऱ्हे), श्री. सतीश जाधव (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा), श्री. आकाश गावित (कनिष्ठ अभियंता) व श्री. आशिष पवार (कनिष्ठ अभियंता) उपस्थित होते. एल अँड टी (२४x७) कंपनीतर्फे श्री. अंकुश बोंद्रे व श्री. विकी महाले उपस्थित होते. तसेच प्रभागातील सर्व वॉलमन यांना बैठकीस बोलावून पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या.

# एमआयटी-एडीटी विद्यापीठ व अपोलो हेल्थकेअर अकादमीमध्ये सामंजस्य करार

- **अलाईड हेल्थ सायन्सेस पदवी अभ्यासक्रमाला सुरुवात**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अलाईड हेल्थ सायन्सेसमधील पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी MIT-ADT University आणि Apollo Healthcare Academy यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. भारतासह जागतिक स्तरावर अलाईड हेल्थ क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेऊन ही भागीदारी महत्त्वाची मानली जात आहे. या सहकार्यामुळे एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि अपोलो हेल्थकेअर अकादमीचे क्लिनिकल कौशल्य यांचा समन्वय साधून विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार पदवी अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत. या अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक शिक्षणाबरोबरच रुग्णालयातील प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा समावेश असेल. ॲनेस्थेसिया व ऑपरेशन थिएटर टेक्नॉलॉजी, मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, क्रिटिकल केअर टेक्नॉलॉजी आदी उच्च मागणी असलेल्या शाखांवर विशेष भर दिला जाणार आहे. नॅशनल कमिशन फॉर अलाईड अँड हेल्थकेअर प्रोफेशनल्स (NCAHP) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आलेले हे अभ्यासक्रम राष्ट्रीय नियामक निकषांशी सुसंगत असतील. विद्यार्थ्यांना अपोलो हॉस्पिटल्स आणि संलग्न आरोग्यसेवा केंद्रांमध्ये संरचित क्लिनिकल रोटेशन आणि अंतिम वर्षात इंटर्नशिपची संधी उपलब्ध होईल, ज्यामुळे त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल. जागतिक आरोग्य संघटना (WHO) च्या अंदाजानुसार, जगभरात अलाईड हेल्थ व्यावसायिकांची कमतरता वाढत असून वृद्ध लोकसंख्या आणि आरोग्यसेवेची वाढती मागणी यामुळे ही तूट अधिक जाणवणार आहे.

# आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत भांडवली निधीतून राबविण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन खडकवासला विधानसभेचे आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या अंतर्गत साईधाम टाकी ते पारी कंपनी चौक धायरी सर्वे नं ३० येथील सुमारे ८०० मीटर पाणीपुरवठा लाईन टाकण्याचे काम तसेच वडगाव बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज नगर, मारुती चरवड कॉलनी व वडगाव बुद्रुक समाज मंदिर परिसरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

या कामांसाठी नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका कोमल नवले, नगरसेविका जयश्री भूमकर, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी विशेष प्रयत्न केले.





यावेळी नगरसेवक श्रीकांत जगताप, नगरसेवक सचिन मोरे, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांच्यासह माजी स्व.सदस्य गंगाधर भडावळे, सागर भूमकर, सारंग नवले, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, तुषार पोकळे, आशुतोष पोकळे, सुमित बेनकर, रमेश चरवड, सचिन मनेरे, शहाजी वांजळे, बाळासाहेब पोरे (काका), दत्तात्रय देशपांडे, अतुल बोरा, अतुल काजळे, संदीप चरवड, प्रकाश लिम्हण, स्वप्निल घाटे, सुनील कांबळे, चंद्रकांत पवळे, मंगेश पायगुडे, अभिजित आढाव, सिद्धांत घोलप, मुकुंद कांबळे, बाळासाहेब चरवड, पांडुरंग वानखेडे महाराज, मुगुट पासलकर, सुरेंद्र गायकवाड, प्रकाश माने , गुलाबराव पाटील ,जितू बुजवले,ज्ञानेश्वर साठे ,रमेश मंडळी ,परमेश्वर शिंगणापूर ,दत्ता पिसे ,सदाशिव गाडेकर ,अमोल मिरेकर ,सुरेश बोडके ,निलेश पायगुडे ,महेश भिसे, अमोल गंगावणे,अतुल फाळके, सतीश नलावडे, अनिल गायकवाड, माऊली नलावडे, गणेश नलावडे, विठ्ठल फाळके, भगवान मिसाळ, मनोहर महाजन, सुनील बर्गे, मोतीराम जाधव, रमजान शेख, पप्पू ढेबे, शिवाजी पवार, सचिन खंडागळे, विजय यादव, योगेश कोळेकर, डॉ. रॉय, अमोल नलावडे, विजय नलावडे, प्रदीप टाकले, भारत भूषण ओझा, दत्ता माने, सिद्धेश्वर सूर्यवंशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक साळुंखे साहेब आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार भीमराव तापकीर यांनी नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले. तसेच येथील चारही भाजप नगरसेवक प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

# शिवणे, उत्तमनगर, कोंढवे धावडे व कोपरे येथील पाणी प्रश्न सुटणार

- **नगरसेवक सुभाष नाणेकर यांची अधिकाऱ्यासमवेत बैठक**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवणे, उत्तमनगर, कोंढवे धावडे आणि कोपरे या भागातील नागरिकांना भेडसावत असलेला पाणी प्रश्न लवकरच सुटणार असल्याची माहिती समोर आली आहे. अनेक दिवसांपासून या परिसरात पाण्याची कमतरता जाणवत असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत लोकप्रिय नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांनी प्रशासनाकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत मा. आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पुणे मनपाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप आणि कनिष्ठ अभियंता रोहन कापसे उपस्थित होते. बैठकीत पाणी समस्येवर चर्चा करण्यात आली आणि लवकरच तांत्रिक सल्लागारामार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पाहणीनंतर आवश्यक कामे करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. महाराष्ट्र शासन व पुणे महानगरपालिका यांच्या विशेष निधीतून लवकरच या भागातील पाणी समस्या कायमची दूर होईल, अशी माहिती नगरसेवक सुभाषभाऊ नाणेकर यांनी दिली आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकीतही देवेंद्र - रविंद्र

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वाधिक जागा पटकाविण्यात पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने महायुतीतील सहकारी पक्षांपेक्षा आणि मविआ आघाडी पक्षांपेक्षा अधिक जागा जिंकून राज्यातील जनतेचा कौल आपल्यालाच आहे हे परत सिद्ध केले. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हीच राजकारणातील आजची जोडी नं. 1 असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि रविंद्र चव्हाण यांच्या नियोजनाच्या बळावर भारतीय जनता पक्षाने राज्यात सर्वाधिक जागा मिळविण्याची अनोखी हॅटट्रिक प्राप्त केली आहे.



नोव्हेंबरमध्ये झालेल्या नगर परिषद निवडणूका, त्यानंतर जानेवारीत झालेल्या महानगरपालिका निवडणुका आणि या फेब्रुवारी महिन्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत देवेंद्र आणि रविंद्र या राजकीय पॉवरफुल जोडीने अचूक निवडणूक नियोजन, प्रभावी प्रचार यंत्रणा पद्धती, स्थानिक पातळीवरील पक्षासोबत राज्य पातळीवरील पक्षाचा थेट संवाद आणि समन्वय अशा विविध माध्यमातून भाजपाला उच्च दर्जाची सक्षम पक्ष यंत्रणा उभारली. त्यामुळे स्थानिक नेतृत्वाला शीर्षस्थ नेतृत्वाचा वरदहस्त लाभला आणि धाकही जाणवला.


## थोडक्यात पण महत्वाचे



### राजीव गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थिनींचे विभागीय स्पर्धेत प्रथम

**पुणे (आरंभ पर्व) :** (IDSSA G2) इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन जी 2 विभागीय क्रीडा स्पर्धेत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, लातूर येथील विद्यार्थिनींनी नांदेड येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या घवघवीत यशामुळे संस्थेच्या क्रीडा परंपरेला आणखी उजाळा मिळाला आहे. या स्पर्धेत संघाच्या कप्तान अक्षता धवन हिने उत्कृष्ट नेतृत्व करत संघाला विजय मिळवून दिला. विद्यार्थिनींच्या या यशामागे मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचे मोलाचे योगदान लाभले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य संतोष मेतगे, उपप्राचार्या योगिता मेतगे, प्राचार्य माधव मुंडे, क्रीडा प्रमुख डी. पी. पाटील तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी विजेत्या संघाचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

### प्रगतशील शेतकरी बाबासाहेब मुरलीधर पोकळे (पाटील) यांचे निधन



**धायरी (आरंभ पर्व) :** धायरी परिसरातील ज्येष्ठ उद्योजक तसेच प्रगतशील शेतकरी बाबासाहेब मुरलीधर पोकळे (पाटील) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून अनेकांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या पश्चात भाऊ, तीन मुले, भावजय, सुना, नातवंडे आणि आठ बहिणी असा मोठा परिवार आहे. प्रसिद्ध उद्योजक दादासाहेब मुरलीधर पोकळे-पाटील यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बापूसाहेब पोकळे पाटील, उद्योजक सागर पोकळे-पाटील आणि संतोष पोकळे-पाटील यांचे ते वडील होत. सामाजिक जाणीव, कष्टाळूपणा आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

### १३ फेब्रुवारी रोजी ‘उत्तर’ घरोघरी पोहोचणार




**नवी दिल्ली (आरंभ पर्व) :** कायमच पुढे जाण्याच्या लगबगीत असलेल्या दुनियेला सातत्याने डावलल्या जाणाऱ्या प्रश्नावर विचार करायला लावणारे ‘उत्तर’. आपण कायमच ‘उद्या बघू’ म्हणून जे टाळतो त्याचे नेमके काय होते? अव्यक्त प्रेमावरील भाष्य. पुढे ढकलण्यात आलेले सत्य. क्षमाशीलतेसाठी वेळ असतो असे गृहीत धरले जाते. आपल्या शांत भावनिक प्रामाणिकपणाने चित्रपटगृहातील प्रेक्षकांच्या मनाला भिडलेला, उत्तर आता 13 फेब्रुवारी रोजी मराठी ZEE5 वरील वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरद्वारे देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज आहे. मनातून अगदी खोलवर हेलावणारे आणि जिव्हाळ्याचे मानवी नाट्य, 'उत्तर' प्रेम, संबंध, क्षमा आणि स्वत्व या नेहमीच ‘उद्यावर’ ढकलल्या जाणाऱ्या स्थगित भावनिक मूल्यांचा शोध घेते. ही कलाकृती दैनंदिन वास्तवात रुजलेली असली तरी तिच्या प्रतिध्वनीत सार्वत्रिक असलेला हा सिनेमा त्या नाजूक क्षणांचे चित्रण करतो. वेळ आपल्या हातातून निसटून जाताना जीवन अशी उत्तरं मागते जी देण्यास आपण तयार नसतो. संवेदनशीलता, संयम आणि अस्सल भावनिक स्पष्टतेसह उत्तर सापडते. फायनल फ्रेमनंतरही बराच काळ मनात रेंगाळते. जे क्षण आपण पुढे ढकलतो आणि नात्यातील जे बंध वाट पाहतील असं आपण गृहीत धरतो; त्यावर चिंतन करण्यास आमंत्रित करते. या कलाकृतीच्या केंद्रस्थानी प्रेम, महत्त्वाकांक्षा आणि वाढत्या मौनामुळे आकार घेतलेले एक कोमल, गुंतागुंतीचे आई-मुलाचे नाते आहे. उमा ही एक आई. जिची उबदार माया शांतपणे तिच्या कुटुंबाला एकत्र ठेवते. निनाद हा एक तरुण. घरापासून जवळजवळ नकळत दूर जात असताना जीवनात पुढे जात असताना, स्वतःचा संघर्ष बाजूला ठेवून परिस्थितीला दोष न देता भावनिक अंतर पार करण्याच्या कसरतीत दिसतो. समकालीन जीवनाच्या आणि पिढ्यांदरम्यान होणाऱ्या बदलाच्या लयबद्धतेवर आधारित, ‘उत्तर’ हे दर्शविते की नातेसंबंध अनेकदा संघर्षातून नव्हे, तर योग्य क्षणाची, योग्य शब्दांची, योग्य वेळेच्या प्रतिक्षेत कसे तुटतात!

# दावोस कराराद्वारे अहिल्यानगरमध्ये १२ हजार कोटींची गुंतवणूक

- **१८ हजार रोजगार निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**
- **तौरल इंडियाच्या सुपा प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन**



**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**

दावोस कराराच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून, यात एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक येणार आहे. याद्वारे १८ हजार रोजगाराची निर्मिती होणार असून उत्तर महाराष्ट्रामध्ये जवळपास ७५ हजार लोकांना रोजगार मिळेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सुपा (ता. पारनेर) एमआयडीसी येथे 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार भागवत कराड, आमदार काशिनाथ दाते, सुरेश धस, विक्रमसिंह पाचपुते, तौरल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक भरत गीते व थोनी ॲल्युमिनियमचे लोथर थोनी आदी उपस्थित होते.

इतक्या मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात गुंतवणूक येत असल्याचे नमूद करीत, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, तौरल इंडियाचा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. स्वतंत्र व आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी 'मेक इन इंडिया' संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. ज्या वस्तूंची आपल्याला आयात करावी लागते, त्याला सक्षम पर्याय देशातच निर्माण करणे ही काळाची गरज आहे. परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या गोष्टी आता भारतात व विशेषतः महाराष्ट्रात भरत गीते यांच्यासारख्या उद्योजकांमुळे तयार होत आहेत, ही अभिमानाची बाब आहे.

राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा समतोल राखण्यावर शासनाचा भर आहे. पूर्वी राज्याची औद्योगिक प्रगती केवळ मुंबई, एमएमआर व पुणे या भागांपुरती मर्यादित होती. ती विकेंद्रित करून राज्याच्या सर्व भागांत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सुपा एमआयडीसी हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. केवळ सामंजस्य करार करून न थांबता, ते प्रत्यक्षात आणण्यासाठी उद्योग विभाग तत्परतेने काम करत आहे. दावोसमध्ये २०२५ मध्ये करण्यात आलेला करार अत्यंत वेगाने प्रत्यक्षात आला आहेत, असेही श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेने ११ व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली असून लवकरच आपण तिसऱ्या क्रमांकावर पोहोचू. भारताच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या प्रवासात तंत्रज्ञान व उत्पादन क्षेत्राचा वाटा मोलाचा ठरणार आहे. या प्रवासात महाराष्ट्र भक्कम पाऊले टाकत आहे. दावोस दौऱ्यात १६ लाख कोटींचे करार करण्यात आले असून, त्यातील ७५ टक्के करार हे अंमलबजावणीच्या मार्गावर आहेत.

केवळ उद्योग उभारणे पुरेसे नाही, तर ते पर्यावरणपूरक असणे आवश्यक आहे. या प्रकल्पात 'सस्टेनेबल कास्टिंग' व 'रिसायकलिंग'वर भर देण्यात आला असून, राज्यात 'उद्योग व पर्यावरण' हातात हात घालून पुढे जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्योजकांनी राज्याचे दूत म्हणून काम करावे, असे आवाहन करत श्री. फडणवीस यांनी उद्योगांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले, उद्योगांसाठी वीज दर पुढील पाच वर्षे स्थिर राहतील किंवा कमी होतील, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच, औद्योगिक वसाहतींमध्ये गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसमध्ये झालेले करार केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरले आहेत, हे राज्यासाठी भूषणावह आहे. एका मराठी उद्योजकाने परदेशी भागीदारांच्या सहकार्याने ५०० कोटींची उलाढाल करणारा उद्योग उभा करणे हे नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. हेलिकॉप्टर, जहाजे आणि रस्ते बांधणीसाठी लागणारे अद्ययावत भाग आता अहिल्यानगरमध्ये तयार होत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

लोथर थोनी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात श्री.गीते यांनी तौरल इंडिया प्रकल्पाबाबत माहिती दिली. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, भगवान गडाचे महंत ह.भ.प. नामदेव शास्त्री, नारायण गडाचे ह.भ.प शिवाजी महाराज यांच्यासह अनेक मान्यवर, उद्योजक व नागरिक उपस्थित होते.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६






## ड्रोवीच्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वामध्ये होणार चिमुकल्या स्वप्नांची रंगीबेरंगी उधळण



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पहिल्या पर्वाला लहान मुलांकडून भरभरून मिळालेल्या प्रतिसादानंतर, ड्रोवी पुन्हा सज्ज आहे चिमुकल्यांच्या पसंतीस पडलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेचे दुसरे पर्व म्हणजेच सीझन २ घेऊन येण्यासाठी. यानिमित्ताने त्यांना आपल्या मुक्त छंद विचारातून आणि कलेच्या माध्यमातून आपली कलाकृती साकारण्याची आणि व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे. मागील वर्षाप्रमाणे यावर्षीच्या स्पर्धेची थीम आहे "Bored? Good! Ideas Flood!". याच थीमच्या सहाय्याने 'ड्रोवी बॉय' म्हणजेच, ड्रोवी या ब्रँडच्या खेळकर अशा मॅस्कॉटसोबत चिमुकल्यांना विविध रंगांच्या माध्यमांतून मनावरची मरगळ झटकून टाकण्यासाठी आणि कंटाळवाणी दिनचर्या मजेदार बनवण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जसे की मुंबई, पुणे, संभाजी नगर, कोल्हापूर, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक आणि सातारा इथे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच मध्य प्रदेशातील इंदूर, रतलाम, खंडवा तसेच निजामाबादसारख्या इतर शहरांमध्येही याचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शहरांतील नामांकित बालरोगतज्ञांच्या सहयोगाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून त्यांचा सक्रिय पाठिंबा या स्पर्धेला असणार आहे. या आयोजनात संबंधित शहरांतील नामांकित बालरोगतज्ज्ञ सहकार्य करत असून ते पुरस्कार वितरणासाठी परीक्षक आणि प्रमुख अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत.

## सचिन सुंबे यांना पुरस्कार प्रदान



**धडाडीचे पत्रकार मा. श्री. सचिन सुंबे यांचा दै. आरंभ पर्व पुणे कार्यालयात 'आदर्श पत्रकार' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यावेळी दै. 'आरंभ पर्व'चे व्यवस्थापकीय संपादक मा. श्री. प्रतिक गंगणे व मार्केटिंग हेड मा. श्री. अभिषेक मरगळे हे उपस्थित होते.**




## सीग्राम रॉयल स्टॅग बूमबॉक्स 'जनरेशन लार्ज'च्या मूळ आवाजासह दमदार पुनरागमन

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

सीग्रामचा रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा बॉलीवूडच्या अजरामर सुरांना आणि हिप-हॉपच्या ऊर्जावान तालांना एकत्र आणणारा, संगीतप्रेमींमध्ये खास ओळख असलेला अनुभवाधारित संगीत महोत्सव पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतिक्षित सीझन फोरसह परतला आहे. मागील सर्व सीझनना मिळालेल्या प्रचंड यशावर उभारलेला हा नवा सीजन यंदा अधिक भव्य आणि महत्त्वाकांक्षी ठरणार असून, भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत कलाकारांची दमदार फळी यात सहभागी होणार आहे. तरुणाईच्या उत्साहाने भरलेल्या व्हिझाग, कोलकाता, मुंबई आणि मोहाली या चार प्रमुख शहरांमध्ये




होणारा हा मल्टी-सिटी टूर संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय अनुभव देणार आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्स हा आजच्या तरुण पिढीच्या विविध आवडी-निवडींना एकत्र आणणारा, आगळा-वेगळा अनुभव देणारा उपक्रम म्हणून ओळखला जातो. संगीत, फॅशन, खाद्यसंस्कृती आणि गेमिंग अशा तरुणाईच्या आवडत्या क्षेत्रांना जोडणाऱ्या उपसंस्कृतिक घटकांचा सुरेख संगम साधत, हा मंच प्रेक्षकांना वेगळ्या आणि प्रभावी अभिव्यक्तीचा अनुभव देतो.

## पुणे इंटरनॅशनल बिझनेस समिट २०२६ : KEZAD ग्रुपने मांडल्या नव्या औद्योगिक संधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

यूएईमधील एकात्मिक व विशेष आर्थिक क्षेत्रांचा सर्वात मोठा ऑपरेटर आणि एडी पोर्ट्स ग्रुपचा भाग असलेल्या अबू धाबी येथील खलिफा इकॉनॉमिक झोन्स – केझाड ग्रुपने पुणे इंटरनॅशनल बिझनेस समिट (पीआयबीएस) 2026 मध्ये प्लॅटिनम प्रायोजक म्हणून ठळक उपस्थिती नोंदवली. या निमित्ताने भारत आणि यूएईमधील व्यावसायिक संबंध तसेच आर्थिक सहकार्य अधिक मजबूत करण्याची आपली बांधिलकी केझाड ग्रुपने पुन्हा एकदा व्यक्त केली.

पीआयबीएस 2026 मधील सहभागातून केझाड ग्रुपने हे स्पष्ट केले की, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, विविध वाहतूक सुविधा, गुंतवणूकदारांसाठी अनुकूल नियम आणि जागतिक बाजारपेठांच्या जवळीक असलेली त्यांची एकात्मिक औद्योगिक व लॉजिस्टिक क्षेत्रे भारतीय उद्योगांना वेगाने आणि कार्यक्षम पद्धतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्यास मदत करतात. पीआयबीएसच्या 7व्या आवृत्तीत 20 हून अधिक देशांतील प्रतिनिधी, 60 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी व धोरणकर्ते तसेच जागतिक व्यापाराचे भविष्य घडवणारे आघाडीचे उद्योगतज्ज्ञ आणि विचार नेतृत्वातील प्रमुख व्यक्ती सहभागी झाले आहेत. ही परिषद देशांमधील सहकार्य, गुंतवणुकीवरील चर्चा आणि महत्त्वाच्या धोरणात्मक भागीदारीसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरते. या वर्षीच्या समिटमध्ये अन्न-पेय (फूड अँड बेव्हरेजेस) आणि ऑटोमोबाईल उद्योगांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हे लक्ष केझाड ग्रुपच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे सुसंगत आहे. केझाड ग्रुप आपल्या आधुनिक औद्योगिक इकोसिस्टमच्या माध्यमातून या प्राधान्य क्षेत्रांमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी काम करत आहे. केझाड ग्रुपच्या औद्योगिक परिसंस्था प्रगत उत्पादन आणि वितरण पायाभूत सुविधांच्या माध्यमातून नवकल्पनांना चालना देण्यासाठी आणि उद्योगांचा विस्तार वेगाने करण्यासाठी उभारण्यात आल्या आहे. केझाडचे अन्न व पेय (फूड अँड बेव्हरेजेस) औद्योगिक क्षेत्र हे मध्य पूर्व, युरोप, आफ्रिका आणि आग्नेय आशिया येथील वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठांसाठी अन्न प्रक्रिया, साठवणूक आणि वितरणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. तसेच ऑटोमोबाईल औद्योगिक क्षेत्र वाहन उत्पादक, सुटे भाग पुरवठादार, वितरक आणि लॉजिस्टिक सेवा देणारे पुरवठादार यांच्यात समन्वय वाढवणारे अनुकूल वातावरण उपलब्ध करून देते, ज्यामुळे त्यांना जागतिक आणि प्रादेशिक बाजारपेठांमध्ये सहज प्रवेश मिळतो. प्रमुख बंदरे, विमानतळे आणि व्यापारी मार्गांशी जोडलेल्या योग्य ठिकाणी असलेल्या औद्योगिक क्षेत्रांमुळे, विविध उद्योगांना मदत करणाऱ्या क्षेत्र-केंद्रित सुविधा आणि उद्योगांसाठी अनुकूल वातावरण यांच्या माध्यमातून केझाड ग्रुप अबू धाबीच्या आर्थिक क्षेत्रांमधून जागतिक स्तरावर विस्तार करू इच्छिणाऱ्या भारतीय उद्योगांना दीर्घकालीन वाढीच्या संधी उपलब्ध करून देत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पाच अनोख्या प्रसिध्द व्यक्तींच्या निवासस्थानाच्या दौऱ्यासह पुनरागमन

**मुंबई (आरंभ पर्व) : भारताची आघाडीची पेंट व सजावट कंपनी एशियन पेन्ट्स आपल्या बहुचर्चित होम डेकोर व स्टोरीटेलिंग उपक्रम 'एशियन पेन्ट्स व्हेअर द हार्ट इज' चा नववा सीझन घेऊन परतली आहे. गेल्या अनेक वर्षांत ही मालिका केवळ घरांच्या सजावटीपुरती मर्यादित न राहता, त्या घरात राहणाऱ्या व्यक्तींच्या भावना, आठवणी आणि जीवनमूल्यांचे प्रतिबिंब म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. सीझन ९ हीच परंपरा पुढे नेत, भिंती व रंगांपलीकडील कथा उलगडतो—जिथे भावना, आठवणी आणि मूल्ये घराला खऱ्या अर्थाने 'घर' बनवतात. या सीझनमध्ये भारतातील काही सर्वाधिक लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांची पाच वेगवेगळी घरे प्रेक्षकांसमोर उघडली जातील ज्यामध्ये आहेत सोनाक्षी सिन्हा व झहीर इक्बाल, गौतम गंभीर, कीर्ती सुरेश व अँटोनी थट्टिल, अर्चना पूरन सिंग व परमीत सेठी, तसेच अमन व प्रिया गुप्ता.प्रत्येकाचे निवासस्थान शैली, भौगोलिक स्थान आणि व्यक्तिमत्त्वाच्या बाबतीत वेगळे असले तरी, त्या सर्वांमध्ये उबदारपणा, प्रामाणिकपणा आणि एक सशक्त भावनिक संबंध समान आहे. या संपूर्ण सीझनमध्ये घरं ही नात्यांनी, दैनंदिन सवयींनी, आठवणींनी आणि जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांनी घडलेली जिवंत कॅनव्हास कशी बनतात, हे दाखवण्यात येते.**

### कोटक फंडची दीर्घकालीन संपत्ती निर्मितीच्या प्रवासाची १५ वर्षे पूर्ण

**मुंबई (आरंभ पर्व) : कोटक महिंद्रा अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("केएमएएमसी" / "कोटक म्युच्युअल फंड") च्या 'कोटक फ्लेक्सिकॅप फंड' योजनेने आपल्या वाटचालीच्या १५ वर्षांचा टप्पा अतिशय यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या फंड योजनेने तिच्या शुभारंभापासून आतापर्यंत गुंतवणूकदारांना सरासरी १६.५९ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा प्रदान केला आहे. बाजारातील विविध चढ-उतारांच्या काळातही या फंडाने या दीर्घकाळात अतिशय दमदार कामगिरीची नोंद केली आहे. कोटक महिंद्रा अ‍ॅसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश शाह म्हणाले, "कोटक फ्लेक्सिकॅप फंडने १५ वर्षे पूर्ण करणे हा आमच्यासाठी त्याचबरोबर या फंडाशी एकनिष्ठ राहिलेल्या गुंतवणूकदारांसाठी अतिशय अभिमानाचा क्षण आहे. फ्लेक्सिकॅप हा गुंतवणूक प्रकार अतिशय महत्त्वाचा ठरला आहे, कारण तो गुंतवणूकदारांना भारताच्या विविध क्षेत्रातील आर्थिक प्रगतीत सहभागी होण्यास संधी देतो. त्याचबरोबर विविध भांडवली मूल्याच्या कंपन्यांमध्ये किती पैसे गुंतवायचे, याचा निर्णय घेण्याची जबाबदारी एका अनुभवी गुंतवणूक टीमवर सोपवण्याची सुविधाही पदान करत." ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, 'कोटक फ्लेक्सिकॅप फंडच्या 'डायरेक्ट प्लॅन - ग्रोथ ऑप्शन' ने गेल्या १० वर्षांत सरासरी १५.७० टक्के दराने वार्षिक चक्रवाढ आणि गेल्या ५ वर्षांत सरासरी १६.८७ टक्के दराने वार्षिक चक्रवाढ परतावा दिलेला आहे.**

## ब्रेस्ट कॅन्सरच्या जागरूकतेसाठी 'सुता' देखील 'पिंक टॅग' उपक्रमात सहभागी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

'फेडरल बँक होर्मिस मेमोरियल फाऊंडेशन' आणि 'नेटवर्क-एटीन संजीवनी' यांच्या 'पिंक टॅग प्रोजेक्ट' मध्ये आता देशांतर्गत डी-टू-सी फॅशन ब्रँड 'सुता' सहभागी झाला असून, ब्लाउजवरील वॉश-केअर लेबलजवळ शिवलेल्या साध्या गुलाबी टॅगद्वारे महिलांना स्वतःची स्तन तपासणी कशी करावी याबाबत सौम्य व भीतीमुक्त मार्गदर्शन दिले जात आहे; ग्रामीण शिंपी, स्वयंसेविका आणि समुदायाच्या सहभागातून सुरू झालेली ही कल्पना आता फॅशनच्या मुख्य प्रवाहात येत लाखो महिलांपर्यंत



आरोग्यजागरूकतेचा संदेश पोहोचवत आहे, विशेषतः भारतात दर चार मिनिटांनी एका महिलेला स्तनाच्या कर्करोगाचे निदान होत असताना आणि ७० टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये उशिरा निदान होत असताना; 'सुता'च्या सह-संस्थापिका सुजाता बिस्वास व तानिया बिस्वास यांनी कपड्यांद्वारे ओळख, आत्मविश्वास आणि स्वतःची काळजी यांचा संगम घडवण्याचा उद्देश व्यक्त केला असून, न्यूज-एटीन स्टुडिओजचे सीओओ सिद्धार्थ सैनी आणि फेडरल बँकेचे चीफ मार्केटिंग ऑफिसर एम.व्ही.एस. मूर्ती यांनी या उपक्रमामुळे माध्यमे, उद्योग आणि समाज एकत्र येऊन सार्वजनिक आरोग्याबाबत दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवू शकतात, असा विश्वास व्यक्त केला आहे.




## भूषण कुमार यांची पुण्यात ठसठशीत वाटचाल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**


शहरात अन्याय, चुकीची कामे आणि सामान्य नागरिकांच्या समस्यांविरोधात ठामपणे उभे राहणारे मनसे सैनिक भूषण कुमार हे नाव सध्या चर्चेत आहे.

कोणताही राजकीय स्वार्थ किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता, मराठी माणसाच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरलेला हा लढवय्या कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन भूषण कुमार यांनी सुरुवातीपासूनच समाजकार्यात सहभाग घेतला. कोणत्याही पक्षात सक्रिय भूमिका नसतानाही त्यांनी मराठी अस्मिता आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठवला आहे. आजही ते कोणताही राजकीय हेतू न ठेवता प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करत असल्याचे दिसून येते.

**समस्यांवर थेट कृती**

- भूषण कुमार यांनी केवळ भाषणांपुरते मर्यादित न राहता अनेक ठिकाणी प्रत्यक्ष आंदोलन करत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे.
- आंबेगाव पठार येथे फुटलेल्या




उद्धव खरड (पत्रकार)

चेंबरमुळे रस्त्यावर सांडपाणी वाहत असल्याने त्यांनी आंदोलन करून समस्या मार्गी लावली.
- शनिवारवाडा परिसरात कानातील मळ काढण्याच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी पुढाकार घेतला.
- नवले ब्रिज परिसरात सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाविरोधात आंदोलन छेडले.
- टोल नाक्यावर मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम असतानाही वसुली सुरू असल्याने नागरिकांच्या हितासाठी वाहतूक मोकळी करून वसुली थांबवण्याची मागणी केली.
- आंबेगाव येथील स्मशानभूमीजवळ रस्त्यावर दिवे नसल्याने अपघाताचा धोका निर्माण होत होता; आंदोलनानंतर तेथे स्ट्रीट लाइट बसवण्यात आल्या.

भूषण कुमार यांचा लढा हा राजकीय स्टंटबाजीसाठी नसून समाजातील अन्यायाविरोधात उभे राहण्याचा आहे, असे त्यांच्या सहकाऱ्यांचे म्हणणे आहे. "जेल झाली तरी चालेल, पण मराठी माणसाचा आवाज दबू देणार नाही," ही त्यांची भूमिका असल्याचेही सांगितले जाते.

मराठी अस्मिता, ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी आणि सामान्य लोकांच्या दैनंदिन समस्यांसाठी कोणी तरी मैदानात उतरले पाहिजे, या भावनेतून ते अहोरात्र काम करत आहेत.

मराठी माणसासाठी एकच अपेक्षा

भूषण कुमार यांची भूमिका स्पष्ट आहे—

मराठी माणसाला त्याचा हक्क मिळावा आणि सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात. कोणताही स्वार्थ किंवा राजकीय फायदा न पाहता काम करणारा मनसेचा एक समर्पित सैनिक म्हणून त्यांची ओळख तयार होत आहे.

पुण्यात त्यांचे नाव आता ओळखले जाऊ लागले असून, येत्या काळात मनसेच्या संघटनात्मक कामात 'भूषण कुमार' हे नाव अधिक ठळकपणे पुढे यावे, अशी अपेक्षा अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




## इंटरनॅशनल यंग शेफ ऑलिम्पियाड २०२६मध्ये अल्बानियाची मोहर

पुणे (आरंभ पर्व) : इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (IIHM) संस्थेचे जागतिक मुख्यालय असलेल्या कोलकत्ता येते १२ व्या IIHM इंटरनॅशनल यंग शेफ ऑलिम्पियाड (YCO) २०२६ चा भव्य समारोप पार पडला. जगभरातील तरुण शेफ्सच्या सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे यंदाचे पर्व कोलकात्यात यशस्वीरीत्या पूर्ण झाले. जगातील सर्वात मोठ्या विद्यार्थी शेफ्सच्या मंचावर, कोलकात्याशी भावनिक नाते असलेल्या मदर तेरेसांच्या जन्मदेशातून आलेल्या अल्बानियाच्या तरुण शेफने इतिहास घडवला. इन्स्टिट्यूटी कुलिनारी नेरान्झी येथील एन्‍री क्युडारी याने सुवर्ण चषक उंचावत सुवर्ण मुकुट परिधान केले आणि जागतिक विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत जगातील सर्वाधिक तरुण शेफ्स सहभागी झाले होते. तसेच या मालिकेमध्ये इंग्लंड दुसऱ्या क्रमांकावर राहिला. वेस्टमिन्स्टर कॅपिटल सिटी कॉलेज येथील डॉमिनिक थॉमस ग्रंडी याला रौप्य चषक प्रदान करण्यात आले. श्रीलंका तिसऱ्या क्रमांकावर राहिला. कोलंबो अकॅडमी ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट येथील विदानागामागे रुमिरा रेशान पियासिरी याने कांस्य चषक पटकावला. पुण्यात झालेल्या ऑलिम्पियाडच्या पहिल्या फेरीतील दमदार कामगिरीमुळे त्याचा अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास अधिक भक्कम ठरला.

## 'घूसखोर पंडत' चित्रपटाबद्दल नीरज पांडे यांचे अधिकृत निवेदन

पुणे (आरंभ पर्व) : आमचा चित्रपट हा पूर्णपणे काल्पनिक पोलिस ड्रामा आहे. यात "पंडत" हा शब्द फक्त एका काल्पनिक पात्रासाठी वापरले गेले आहे. ही कथा एका व्यक्तीच्या कृती आणि निर्णयांवर आधारित आहे. याचा कोणत्याही जाती, धर्म किंवा समुदायाशी संबंध नाही, तसेच कोणावरही टीका करण्याचा उद्देश नाही. एक चित्रपट दिग्दर्शक म्हणून मी माझ्या कामाकडे मोठ्या जबाबदारीने पाहतो आणि नेहमी विचारपूर्वक आणि आदराने कथा मांडतो. हा चित्रपटही माझ्या आधीच्या चित्रपटांप्रमाणेच प्रामाणिक हेतूने आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठीच तयार केला गेला आहे. चित्रपटाच्या शीर्षकामुळे काही प्रेक्षकांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, याची आम्हाला जाणीव आहे आणि आम्ही त्यांच्या भावनांचा मनापासून आदर करतो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन, सध्या आम्ही चित्रपटाशी संबंधित सर्व प्रचार साहित्य हटवण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्या मते, हा चित्रपट पूर्ण पाहून आणि त्याची कथा समजून घेऊनच त्यावर मत द्यावे, फक्त काही भाग पाहून निष्कर्ष काढू नये. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांसमोर सादर करण्यास मी उत्सुक आहे.

## 'अमर विश्वास'चा ट्रेलर प्रसिद्ध




मुंबई (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयर'ने आज सत्ता, गुन्हेगारी आणि न्यायाचे पदर असलेला, कथानकाला गहनता लाभलेला मनोरंजक कोर्टरूम ड्रामा 'अमर विश्वास' या आगामी ओरिजनल सिरीजच्या ट्रेलरचे अनावरण केले. रवी बहल, आमिर अली आणि बरखा बिष्ट यांच्यासमवेत राजीव खंडेलवालची मुख्य भूमिका असलेली ही मालिका उच्च-जोखमीच्या न्यायालयीन लढाईसाठी मंच तयार करते; जिथे सत्य हे दुर्लक्षित असते आणि न्यायाला मोठी किंमत मोजावी लागते. ट्रेलरची सुरुवात प्रभावशाली सिनेनिर्माते जेसू मोमीन यांच्या क्रूर हत्येपासून होते. ज्या प्रकरणाला प्रसारमाध्यमे त्वरित 'ओपन-अँड-शट' हे लेबल लावतात. लोकांच्या समजुतीनुसार आधीच दोषी ठरलेल्या बहार चक्रवर्ती या तरुणीवर लगेच संशय येतो. 'अमर विश्वास' हा या शर्यतीत उतरणारा एक हटके आणि चाणाक्ष वकील आहे. निव्वळ तथ्यं क्वचितच संपूर्ण कथेवर प्रकाश टाकतात हे त्याला पक्के ठाऊक आहे. अमर हा बहरचा बचाव करत असताना, तो शोषण, हेराफेरी आणि दीर्घकाळ दडवून ठेवलेल्या रहस्यांचे कंगोरे उघड करू लागतो. ज्यामुळे एक कट उघडा पडतो. जो सुरुवातीला दिसतो त्यापेक्षा अधिक खोल आणि गडद असतो.

## AM/NS ग्रीन स्टील सर्टिफिकेशन मिळालेली इंटिग्रेटेड स्टील प्रोड्यूसर

AM/NS INDIA

दिल्ली/मुंबई (आरंभ पर्व) : आर्सेलॉरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS इंडिया) झाली आहे नवीन ग्रीन स्टील टॅक्सॉनॉमीमध्ये 'मिनिस्ट्री ऑफ स्टील्स'कडून नवीन 'ग्रीन स्टील सर्टिफिकेशन' मिळालेले देशातील पहिले इंटिग्रेटेड स्टील प्रोड्यूसर. 'AM/NS इंडिया'च्या 'हॉट रोल्ड' (HR) कॉइल्स आणि शीट्सना फोर-स्टार रेटिंग मिळाले आहे आणि 'कोल्ड रोल्ड' (CR) कॉइल्स आणि शीट्सना थ्री-स्टार रेटिंग मिळाले आहे. ऑटोमोटिव, इन्फ्रास्ट्रक्चर, डिफेन्स, कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट आणि कन्झ्युमर ड्यूरेबल्स सेक्टर्ससाठी महत्वाची इन्पुट्स असलेली ही प्रॉडक्ट्स - आता सरकार प्रमाणित ग्रीन स्टीलसाठी अधिकृतपणे मान्यताप्राप्त आहेत, जी कस्टमर्सना त्यांच्या व्हॅल्यू चेन्समध्ये (or मूल्य शृंखलेमध्ये) स्कोप 3 एमिशन्स कमी करणे शक्य करतात प्रमाणीकरणासाठीची पात्रता फिनिश्ड स्टीलच्या ($tCO_2e/tfs$) प्रति टन समतुल्य $CO_2$च्या 2.2 टन्सपेक्षा कमी पात्र गणल्या गेलेल्या थ्रेशोल्डसह (or आरंभासह) स्टील प्रॉडक्शनच्या (or उत्पादनाच्या) एमिशन्स इंटेन्सिटीवर (or उत्सर्जन तीव्रतेवर) आधारलेली आहे. ह्या थ्रेशोल्डपेक्षा (or आरंभापेक्षा) कमी एमिशन्ससह (or उत्सर्जनासह) तयार करण्यात आलेले स्टील थ्री-टियर सिस्टिम अंतर्गत: थ्री-स्टार, फोर-स्टार किंवा फाइव-स्टार ग्रीन स्टीलम्हणून रेट केले जाते.

# सरहद स्वयंसेवी संस्थेला अहिंसा आणि शाकाहारासाठी पुरस्कार प्रदान

- भगवान महावीर फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या महावीर पुरस्काराचे स्वरूप १० लाख रुपये रोख, स्तुतीपर मानपत्र आणि सन्मानचिन्ह
- अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यकशास्त्र आणि समुदाय व समाज सेवा या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या देशभरातील संस्थांमधून पुरस्कारविजेत्यांची निवड

BHAGWAN MAHAVEER FOUNDATION CHENNAI

**पुरस्काराच्या चार प्रवर्गांमध्ये निस्वार्थ सेवा करणाऱ्यांकडून फाउंडेशनने ३० व्या महावीर पुरस्कारांसाठीही अर्ज मागवले आहेत. नामांकन अर्ज फाउंडेशनच्या वेबसाइटवरून डाउनलोड केले जाऊ शकतील: www.bmfawards.org.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उत्कृष्ट मानवतावादी सेवेची दखल घेण्याच्या उद्देशाने भगवान महावीर फाउंडेशनतर्फे दिला जाणारा २९वा महावीर पुरस्कार सरहद या पुणेस्थित सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थेला प्रदान करण्यात आला आहे. अहिंसा व शाकाहाराच्या समर्थनासाठी तसेच शिक्षण, सांस्कृतिक संवाद व जनसंवाद यांच्या माध्यमातून मानवतावादी मूल्यांना बढावा देण्यासाठी संस्थेने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल महावीर पुरस्कार २०२६ द्वारे घेण्यात आली आहे. अहिंसा व शाकाहार, शिक्षण, वैद्यकशास्त्र आणि समुदाय व समाज सेवा या क्षेत्रांमधील कामगिरीसाठी दरवर्षी महावीर पुरस्कार प्रदान केला जातो. प्रत्येक महावीर पुरस्कार विजेत्याला १० लाख रुपये रोख आणि त्यासोबत स्तुतीपर मानपत्र व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. संजय नहार यांनी १९९५ मध्ये स्थापन केलेली सरहद पंजाब, जम्मू-काश्मीर व ईशान्य भारत आदी भारतातील संघर्षप्रवण भागांमध्ये शांतता राखण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी समर्पित सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था आहे. शांतताफेऱ्या, दोन धर्मांमधील संवाद, सांस्कृतिक उत्सव, शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थी आदानप्रदान उपक्रम यांच्याद्वारे 'सरहद'ने विविध समुदायांमध्ये सौहार्द, विश्वास व परस्पर सामंजस्य जोपासले आहे. त्याचबरोबर संघर्षप्रवण प्रदेशांतील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक व निवासी सहाय्यही संस्थेतर्फे पुरवले जाते.

सरहद संस्थेसोबतच पुढील संस्थांना २९व्या महावीर पुरस्काराने गौरवण्यात आले: कॉर्ड, हिमाचल प्रदेश, शिक्षण; श्री शंकरा कॅन्सर फाउंडेशन, कर्नाटक, वैद्यकशास्त्र; आणि श्रीमती संगखुमी बुआलचुआक, मिझोराम व निर्माण, ओडिशा, समुदाय व सामाजिक सेवा.

भगवान महावीर फाउंडेशनचे संस्थापक श्री. सुगलचंद जैन यावेळी म्हणाले, "सरहद संस्थेने अहिंसा व मानवतावादी मूल्यांचे चैतन्य कृतीत उतरवण्याचे उदाहरण घालून देण्याजोगे कार्य केले आहे. संवाद, शिक्षण व नीतीमत्तापूर्ण सहभाग समाज परिवर्तनात किती महत्त्वाची भूमिका बजावू शकतात हे 'सरदह'च्या कामातून दिसून येते. शांतता व सौहार्दाचा प्रसार करण्यासाठी 'सरहद'ने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे. या पुरस्काराच्या रूपाने मिळालेली मान्यता 'सरहद'चे उद्दिष्ट आणखी दृढ करण्यात तसेच अन्य अनेकांना प्रेरणा देण्यात उपयुक्त ठरेल, अशी आशा आम्हाला वाटते."

२०२६ सालासाठी प्रदान केल्या गेलेल्या पुरस्कारांनंतर महावीर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची संख्या १०१ झाली आहे. हे १०१ पुरस्कारविजेते २६ राज्ये व २ केंद्रशासीत प्रदेशांतील आहेत. २९व्या पुरस्कारांपूर्वी महावीर पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांची संख्या ९६ होती. गेल्या अनेक वर्षांपासून महावीर पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जात आहेत. यांमध्ये भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्री यांचा समावेश आहे. औपचारिक सोहळ्यांमध्ये हे पुरस्कार प्रदान केले जातात.

२९व्या महावीर पुरस्कारासाठी देशभरातून आलेल्या २६७ नामांकन अर्जांचे मान्यवरांच्या परीक्षण मंडळाद्वारे काळजीपूर्वक मूल्यमापन करण्यात आले. भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती श्री. एम. एन. वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखालील समितीने यंदा ही जबाबदारी पार पाडली. ज्येष्ठ संन्यासिनी आचार्य श्री. चंदनाजी महाराज, माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. श्री. डी. वाय. चंद्रचूड, भारतीय रिझर्व बँकेचे अंशकालीन संचालक तसेच 'तुघलक'चे संपादक श्री. एस. गुरूमूर्ती, भारतीय विद्या भवन मंगलगुरू केंद्राचे चेअरमन प्राध्यापक बी. एम. हेगडे, भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त श्री. टी. एस. कृष्णमूर्ती, निवृत्त आयएएस अधिकारी तसेच सेबीचे माजी अध्यक्ष श्री. डी. आर. मेहता, भारत सरकारचे माजी कॅबिनेट सचिव श्री. प्रभात कुमार (निवृत्त आयएएस अधिकारी) आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. जी. एस. सिंघवी यांचा परीक्षण मंडळावर समावेश होता.

## यूएईमार्गे जागतिक व्यवसाय संधींचा विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक बाजारपेठेत प्रवेश आणि व्यवसाय विस्तारासाठी पुण्यात दोन दिवसीय B2B बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. FICCIच्या पुढाकारातून शारजाह एअरपोर्ट इंटरनॅशनल फ्री झोन (SAIF झोन), यूएई सरकार आणि Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture (MACCIA) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. "यूएईद्वारे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये तुमचा व्यवसाय वाढवा" या थीमवर आधारित या बैठका १० आणि ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील JW Marriott Hotel Pune येथे होणार आहेत. पुणे आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांना यूएईमध्ये, विशेषतः SAIF झोनच्या माध्यमातून, ऑपरेशन्स सुरू करण्याच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. SAIF झोन हे या प्रदेशातील प्रगत, किफायतशीर आणि गुंतवणूकदार-अनुकूल मुक्त क्षेत्रांपैकी एक मानले जाते. या बैठकीत भारतीय कंपन्यांना मध्य पूर्व, आफ्रिका, युरोप आणि इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी यूएई कसे प्रभावी जागतिक प्रवेशद्वार ठरू शकते, यावर विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच कंपनी स्थापन प्रक्रिया, परवाना, गोदाम सुविधा, लॉजिस्टिक्स उपाययोजना आणि बाजारपेठ प्रवेश धोरणांबाबत SAIF झोनचे वरिष्ठ अधिकारी थेट संवाद साधणार आहेत. याशिवाय भारत-यूएई व्यापक आर्थिक भागीदारी करार (CEPA) चा उपयोग करून व्यापार सुलभीकरण, शुल्क सवलती आणि सुलभ नियामक प्रक्रिया कशा मिळवता येतील, याबाबतही सहभागी उद्योगांना सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या B2B बैठकीसाठी नोंदणी व वेळेच्या स्लॉटची पुष्टी करण्यासाठी इच्छुकांनी श्री. आशुतोष यांच्याशी ९६५०९०३२९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

## सोनालिकाने पूर्णपणे नवीन आणि शक्तिशाली 'सोनालिका गोल्ड सिरीज' केली लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




सोनालिका ट्रॅक्टरने गेल्या ३० वर्षांपासून भारतातील कृषी परिवर्तनाची आधारभूमी म्हणून कार्य केले आहे. सर्व प्रकारच्या माती आणि पिकांच्या विविधतेतील शेतकऱ्यांच्या विकसित होत असलेल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांना जिंकण्याची ताकद (जीतने का दम) देण्यावर कंपनीने दृढ विश्वास बाळगला आहे. आपल्या ब्रँडवरील शेतकऱ्यांच्या विश्वासाला ३० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून सोनालिका ट्रॅक्टरने पूर्णपणे नवीन आणि शक्तिशाली 'सोनालिका गोल्ड सिरीज' लाँच केली आहे. ती त्यांच्या "जेव्हा शेतकरी पुढे जातो, तेव्हा देश पुढे जातो" या तत्वज्ञानाचे प्रकटीकरण आहे.

सर्वात मोठ्या इंजिन आणि नवीन सुट्या भागांसह कामगिरीचे बावनकशी सोने सोनालिका गोल्ड मालिका 'खऱ्या सोन्या'चे सर्वार्थाने प्रतिनिधित्व करते. ती काळाबरोबरच वाढणारा विश्वास आणि मूल्य देते आणि प्रत्येक हंगामात ताकद देणाऱ्या तंत्रज्ञानाने बनवलेली आहे. शेतीची अवजारे आकाराने वाढत असताना, शेतकऱ्यांवर कामाचा बोजाही वाढत आहे. त्यामुळे सोनालिकाने शेतकऱ्यांच्या वेगाने वाढणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या नवीन मालिकेतील दोन ट्रॅक्टर – गोल्ड डीआय ७४५ III आणि गोल्ड डीआय ५५ III लाँच केले आहेत. नवीन गोल्ड डीआय ७४५ III ट्रॅक्टरला या श्रेणीतील नवीन आणि सर्वात मोठ्या ३ सिलेंडर ई ३.५ इंजिनची शक्ती लाभली आहे. जोरदार कामगिरीसाठी ती २२० एनएम च्या कमाल टॉर्कसह ३५३२ सीसी क्षमता प्रदान करते.

यात एक नवीन १६एफ +४ आर मल्टी-स्पीड ट्रान्समिशनसुद्धा असून ते विविध उपयोगांमध्ये उच्च कार्यक्षमतेसह जड भार चालविण्यासाठी सुरळीत शक्ती मिळण्याची सुनिश्चिती करते. सर्वार्थाने नवीन ग्लोबल पीटीओ आणि हेवी ड्युटी लिंकेजसह २००० किलो लिफ्ट क्षमतेसह हायड्रॉलिक्स यांची रचना शेतकऱ्यांना पूर्ण आत्मविश्वासाने मोठी अवजारे वापरण्यासाठी करण्यात आली आहे. अगदी एक्झॉस्ट सिस्टमसुद्धा दीर्घ काळ काम करताना सातत्यपूर्ण कामगिरीची सुनिश्चिती करण्यासाठी दमदारपणे डिझाइन करण्यात आली आहे. यासोबतच, नवीन गोल्ड डीआय ५५ III ट्रॅक्टरमध्येसुद्धा नवीन सर्वात मोठे ई ३.५ इंजिन आणि १२एफ + ३आर मल्टी स्पीड ड्राईव्हलाईन लाभली आहे. त्यात कठीण ऑपरेशन्समध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी २३५ एनएम चा कमालतम टॉर्क देणारा डबल क्लच आयपीटीओ आहे. यात २,२०० किलो लिफ्ट क्षमतेसह सर्वार्थाने नवीन हायड्रॉलिक्स आणि हेवी ड्युटी लिंकेज आहेत, त्यामुळे मोठी अवजारे चालवण्यासाठी ते भविष्यानुकूलसुद्धा ठरतात. शेतकऱ्यांचा आराम हा मुख्य प्राधान्य मानून या दोन्ही ट्रॅक्टरना मस्क्युलर बिल्ट डिझाइन, सुरक्षिततेचे निदर्शक असलेले सिग्नेचर गोल्ड बॅजिंग आणि जेटलाइन थ्रॉटल, गोल्डन ग्लो हेडलॅम्प, एर्गो डेक प्लॅटफॉर्म, नेक्स्ट जनरेशन क्लस्टर आणि गॅस स्ट्रट्स असे एकत्रित वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त कार्यक्षमता लाभून या ट्रॅक्टरची मालकी अभिमानास्पद होते.

नवीन गोल्ड मालिकेमागील दृष्टीचे विवेचन करताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमन मित्तल म्हणाले, आपल्या भारतीय संस्कृतीत सोने हा सुरक्षिततेचा आधारस्तंभ, स्थिरतेचे प्रतीक आहे शेतकऱ्यांना त्यांच्या ट्रॅक्टरकडून तीच खात्री मिळायला हवी. सोनालिका गोल्ड ही मालिका या तत्वज्ञानाचे मूर्त स्वरूप आहे. ही गोल्ड मालिका ३० वर्षांच्या वारशातून घडविलेली असून ती भविष्यानुकूल अभियांत्रिकीसह परिष्कृत केलेली आहे. गोल्ड मालिका ही एका एक अत्याधुनिक गुंतवणुकीचे प्रतिनिधित्व करते.

# भीमाशंकर मंदिर राहणार बंद

### भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे – जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



**श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा भाग असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे मुसळधार पाऊस पडतो. त्यामुळे त्या काळात बांधकाम करणे शक्य नसते. उपलब्ध कालावधीतच कामे पूर्ण करण्यासाठी विकासकामांना गती देणे अत्यावश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून, दि. १२ फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ फेब्रुवारी २०२६ या महाशिवरात्री कालावधीतही श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या नित्यदर्शनासाठी बंद राहणार असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे. भाविकांनी व स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.**

सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, कुंभमेळा कालावधीत नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ मधील अनुभव लक्षात घेऊन, भविष्यातील वाढत्या भाविकसंख्येच्या सुरक्षित व सुव्यवस्थित व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी 'श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७ – गर्दी व्यवस्थापन व सुविधा विकास)' यास मंजुरी दिली आहे. या आराखड्यांतर्गत भाविकांसाठी सुरक्षित, सुसज्ज व सोयीस्कर सुविधा निर्माण करण्यासाठी नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश–निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग तसेच आधुनिक गर्दी व्यवस्थापन प्रणालीची कामे सध्या वेगाने सुरू आहेत. कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. कुंभमेळ्याच्या काळात होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता जुना सभामंडप अपुरा ठरणार असल्याने नवीन सभामंडप उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी जुना सभामंडप पूर्णतः उतरविण्यात आलेला असून, पायरी मार्गाचे कामही सुरू आहे. सध्या मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर दगडी बांधकाम, बांधकाम साहित्य व अवजड यंत्रसामग्री ठेवण्यात आलेली आहे. कामांचे स्वरूप, परिसरातील भौगोलिक परिस्थिती आणि दररोज येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता, बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भाविकांची सुरक्षितता अबाधित राखणे व विकास आराखड्यातील कामे नियोजित वेळेत पूर्ण करणे या उद्देशाने यापूर्वी मंदिर तीन महिन्यांसाठी (महाशिवरात्री कालावधी वगळून) तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र, सध्या सुरू असलेल्या कामांचा वेग, व्याप्ती व सुरक्षेच्या दृष्टीने सखोल आढावा घेतल्यानंतर, महाशिवरात्रीच्या कालावधीत मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे सुरक्षित नसल्याचे निदर्शनास आले आहे. मोठ्या प्रमाणात सुरू असलेले दगडी बांधकाम व साहित्य हलविणे शक्य नसल्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो.


## ग्रामपंचायत कनेरसर ता. खेड, जि. पुणे

### निविदा नोटीस

खालील कामांची सिलबंद निविदा ग्रामपंचायत कनेरसर, ता. खेड, जि. पुणे हे सार्वजनिक बांधकाम विभाग/ जिल्हा परिषद पुणे यांचेकडे नोंदणीकृत मक्तेदार / ठेकेदारांकडून (२ लिफाफा पद्धतीने) मागवीत आहे.

कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कनेरसर, ता. खेड, जि. पुणे यांजकडून दि. १०/०२/२०२६ ते १६/०२/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी ११:०० ते दुपारी ०२:००) या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात देण्यात येतील. भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. १०/०२/२०२६ ते १६/०२/२०२६ रोजी दुपारी ०३ : ०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कनेरसर, ता. खेड, जि. पुणे येथे स्वीकारल्या जातील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. १६/०२/२०२६ रोजी दुपारी ०३: ३० वाजता (कार्यालयीन सोईनुसार) किंवा लगतच्या मासिक सभेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कोरी निविदा किंमत | कामाचा कालावधी | मक्तेदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कनेरसर येथील पाणी पुरवठा योजना टाकी ते गावठाण पर्यंत ४ इंची पाईपलाईन करणे. | १५वा वित्त आयोग/ ग्रामनिधी | ३,६९,४९८/- | १ टक्के | ५९०/- | ६ महिने | खुला |
| २ | मौजे कनेरसर येथील पालखी विसावा शेड समोर व पश्चिम बाजूने उर्वरित कॉंक्रीटीकरण करणे. | ग्रामनिधी | १,००,०००/- | १ टक्के | २६०/- | ६ महिने | खुला |
| ३ | मौजे कनेरसर येथील गावठाण ते आर. आर. कॉलनी नं. १ ठाकरवाडी कडे जाणारा जुन्या रस्त्यावर तीन फुट सिमेंट पाईप टाकणे. | ग्रामनिधी | ६०,०००/- | १ टक्के | २६०/- | ६ महिने | खुला |
| ४ | मौजे कनेरसर येथील जि. प. शाळा हजारेवस्ती उर्वरित संरक्षण भिंत बांधणे. | ग्रामनिधी | २,००,०००/- | १ टक्के | ५९०/- | ६ महिने | खुला |

टीप : १) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित दाखले सादर करणे आवश्यक आहे. २) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती बाबतचा तपशील निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस अधीन राहून निविदाधारक ठेकेदारास लागू राहतील याची नोंद घ्यावी. ३) सदर इसारा रक्कम ही ग्रामपंचायत कनेरसर या नावाने डी. डी/चेक स्वरुपात जमा करणे आवश्यक राहील. ४) विहित मुदतीनंतर बंद लिफाफा (दरपत्रके) स्वीकारली जाणार नाहीत. ५) बंद लिफाफा पोस्टाने किंवा समक्ष सदर निविदा मागणी कालावधीत दि. १६/०२/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेपूर्वी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ६) प्राप्त निविदा लगतच्या मासिक सभेत उघडण्यात येतील. ७) प्राप्त निविदांपैकी निविदा स्वीकारणे व फेटाळणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे. ८) सदर कामाची सुरक्षा अनामत रक्कम भरल्याशिवाय कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही. ९) वरील अटी व शर्तीस अधीन राहून दरपत्रके सादर करावीत.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कनेरसर ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कनेरसर ता. खेड, जि. पुणे


दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.